मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीरातीसाठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# पिंपरी महापालिका निवडणुकीसाठी 11 नोव्हेंबरला आरक्षण सोडत

## चिंचवड, पिंपरी, भोसरी आणि भोर या विधानसभा मतदारसंघांची मतदारयादी प्रभागनिहाय विभाजन करून तयार करण्यात आली

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या आगामी निवडणुकीसाठी प्रभागनिहाय आरक्षण सोडत ११ नोव्हेंबर रोजी चिंचवड येथील प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहात सकाळी ११ वाजता काढण्यात येणार आहे. अनुसूचित जाती (एससी), अनुसूचित जमाती (एसटी), इतर मागासवर्ग (ओबीसी), खुल्या (ओपन), तसेच महिला आरक्षित जागांसाठी चक्राकार पद्धतीने सोडत काढण्यात येणार आहे. मतदार यादी प्रसिद्ध करण्यास राज्य निवडणूक आयोगाने मुदतवाढ दिली आहे. आता १४ नोव्हेंबर रोजी प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध केली जाणार आहे.

महापालिका निवडणुकीसाठी चिंचवड, पिंपरी, भोसरी आणि भोर (ताथवडे गाव) या विधानसभा मतदारसंघांची मतदारयादी प्रभागनिहाय विभाजन करून तयार करण्यात आली आहे. ती सहा नोव्हेंबर रोजी प्रसिद्ध करण्यात येणार होती. परंतु, निवडणूक आयोगाने मतदार यादी प्रसिद्ध करण्याचा सुधारित कार्यक्रम मंगळवारी जाहीर केला आहे. त्यानुसार आता १४ नोव्हेंबर रोजी प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध केली जाणार आहे. या यादीवर २२ नोव्हेंबरपर्यंत हरकती व सूचना महापालिकेच्या मुख्य कार्यालयातील मतदारयादी कक्षात, तसेच सर्व क्षेत्रीय कार्यालयांत स्वीकारण्यात येणार आहेत. हरकतीवर निर्णय घेऊन प्रभागनिहाय अंतिम मतदार याद्या सहा डिसेंबर रोजी प्रसिद्ध करण्यात येणार आहेत. आठ डिसेंबर रोजी मतदान केंद्रांच्या ठिकाणाची आणि १२ डिसेंबर २०२५ रोजी मतदान केंद्रनिहाय मतदार यादी प्रसिद्ध केली जाणार आहे.

यंदा आरक्षण सोडतीवर हरकती व सूचना स्वीकारण्यात येणार आहेत. १७ ते २४ नोव्हेंबर या कालावधीत सूचना व हरकती मागविण्यात येणार आहेत. त्यावर निर्णय घेऊन महापालिका आयुक्त दोन डिसेंबरला आरक्षण अंतिम करणार आहेत. त्यानंतर आरक्षण सोडत शासन राजपत्रात प्रसिद्ध केली जाणार आहे.




### आरक्षण सोडतीसाठी चंद्रकांत पुलकुंडवार यांची नियुक्ती

» महापालिका आयुक्त श्रावण हर्डीकर यांची बिहार विधानसभा निवडणुकीसाठी निरीक्षक म्हणून नियुक्ती केली आहे. त्यामुळे महापालिकेच्या आरक्षण सोडतीसाठी पुणे विभागीय आयुक्त चंद्रकांत पुलकुंडवार यांची प्राधिकृत अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली. या सोडतीचा अहवाल आयोगास सादर केला जाईल. याबाबतचा आदेश राज्य निवडणूक आयोगाचे सचिव सुरेश काकाणी यांनी काढला आहे.

### हरकतींवर सुनावणीसाठी उपायुक्तांची नियुक्ती

» मतदारयादीवरील हरकती व सूचनांची छाननी करून निर्णय घेण्यासाठी सहशहर अभियंता दर्जाच्या अधिकाऱ्यांची क्षेत्रीय कार्यालयनिहाय प्राधिकृत अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. त्यात आता बदल केला असून, उपायुक्तांकडे जबाबदारी दिली आहे. उपायुक्त सीताराम बहुरे ('अ' आणि 'फ'), राजेश आगळे ( 'ब' आणि 'ग'), नीलेश भदाणे ( 'ड' आणि 'ह') आणि डॉ. प्रदीप ठेंगल ('क' आणि 'इ') यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

> “ आरक्षण सोडतीची तयारी महापालिकेने सुरू केली आहे. ११ नोव्हेंबर रोजी राज्य निवडणूक आयोगाने आखून दिलेल्या नियमानुसार सोडत काढली जाईल.
>
> \- सचिन पवार, उपायुक्त, निवडणूक विभाग, पिंपरी-चिंचवड महापालिका


# अखेर 'त्या' नरभक्षक बिबट्याचा शार्प शूटरकडून खात्मा

## पिंपरखेड येथे नरभक्षक बिबट्याला ठार करण्यात वन विभागाला यश आलं आहे

**पिंपरी | प्रतिनिधी**

अखेर शिरूर तालुक्यातील पिंपरखेड येथे नरभक्षक बिबट्याला ठार करण्यात वन विभागाला यश आलं आहे, रात्री उशिरा गावामध्ये बिबट्याचा शोध घेत असताना वन विभागाला हा बिबट्या ड्रोनमध्ये दिसला. नंतर या बिबट्याला पकडण्यासाठी डार्ट मारण्याचा प्रयत्न केला गेला, डार्ट मिस झाला. मात्र यामुळं सावध झालेल्या बिबट्याने थेट वनविभागाच्या कर्मचाऱ्यांवरती प्रतिहल्ला करण्याचा प्रयत्न केला. मग शेवटी दोन शार्प शूटरने या बिबट्यावरती तीन राऊंड फायर केले, यात बिबट्या ठार झाला. ६ वर्ष वयाचा नर जातीचा हा नरभक्षक बिबट्या आहे.

१३ वर्षीय रोहनचा जीव ज्या ठिकाणी घेतला तिथून ४०० मीटर अंतरावर या बिबट्याला ठार करण्यात आलं. हा तोच नरभक्षक बिबट्या असल्याचं त्याच्या नमुन्यांवर आणि ठस्यांवरून स्पष्ट झालं आहे. पिंपरखेड व परिसरामध्ये मागील वीस दिवसांमध्ये दिनांक १२ ऑक्टोंबरला शिवन्या शैलेश बोंबे, वय ५ वर्ष ६ महिने, दिनांक २२ ऑक्टोंबरला भागुबाई रंगनाथ जाधव, वय ८२ वर्षे आणि रोहन विलास बोंबे वय१३ वर्षे यांचे दुर्दैवी मृत्यू बिबट्याच्या हल्ल्यामध्ये झाल्याने मोठ्या प्रमाणात संताप उसळला होता.



जुन्नर, शिरूर, आंबेगाव व खेड तालुक्यामधील मोठ्या प्रमाणात वाढलेल्या बिबट्याच्या हल्ल्याच्या निषेधार्थ १२ ऑक्टोंबरला व २२ ऑक्टोंबरला पंचतळे येथे बेल्हे जेजुरी राज्यमार्ग रोखून तसेच दिनांक ३ नोव्हेंबरला मंचर येथे पुणे नाशिक महामार्ग रोखून वरील चारही तालुक्यातील ग्रामस्थांनी तीव्र आंदोलन केले होते.

टीमने त्यास बेशुद्ध करण्यासाठी डार्ट मारला, परंतु तो अपयशी ठरल्याने बिबट्या चवताळून प्रति हल्ला करत असताना बंदूकधारी शार्प शूटर यांनी त्यावर रात्री १०.३० वाजताच्या सुमारास गोळी झाडल्याने नर बिबट्या मृत झाला असून त्याचे वय अंदाजे पाच ते सहा वर्ष असल्याचे दिसून आले. त्यानंतर सदर नरभक्षक बिबट्याचे शव मौजे पिंपरखेड येथील ग्रामस्थांना दाखविण्यात आले त्यानंतर सदर शव शवविच्छेदना करिता माणिकडोह बिबट निवारा केंद्र येथे हलविण्यात आले अशी माहिती समोर आली आहे.

# पिंपरी-चिंचवड मतदार यादीत हजारो दुबार नावे

## राष्ट्रवादीकडून निवडणूक विभागाकडे तक्रार, अजित गव्हाणे यांची कारवाईची मागणी

**पिंपरी | प्रतिनिधी**

राज्यात मतदार यादीतील घोळ आणि दुबार मतदारांच्या नावांवरून राजकारण तापले आहे. त्यात पिंपरी-चिंचवड शहरातही दुबार मतदारांचा मुद्दा पुढे आला आहे. पिंपरी, चिंचवड व भोसरी विधानसभा मतदारसंघात हजारो दुबार नावे आहेत. ती नावे रद्द करावीत, अशी तक्रार महायुतीतील राष्ट्रवादी कॉंग्रेसचे (अजित पवार) माजी शहराध्यक्ष अजित गव्हाणे यांनी महापालिकेच्या निवडणूक विभागाकडे केली आहे

पिंपरी-चिंचवड महापालिकेची निवडणूक जानेवारी 2026 ला होत आहे. त्यासाठी सर्वच पक्षांकडून जय्यत तयारी करण्यात येत असून, इच्छुक माजी नगरसेवक प्रभागात कामाला लागले आहेत. त्यात दुबार मतदारांचा पुढे आल्याने शहरातील वातावरण तापत आहे.

माजी शहराध्यक्ष अजित गव्हाणे यांनी दुबार मतदारांची यादी महापालिकेच्या निवडणूक विभागाकडे सादर केली आहे. आगामी निवडणूक पारदर्शक वातावरणात पार पाडण्यासाठी मतदार यादीतील त्रुटी दूर करणे आवश्यक आहे. त्रुटी दूर न झाल्यास एकाच प्रभागात वेगवेगळ्या मतदार केंद्रावर दुबार व तिबार मतदान होण्याची शक्यता आहे. त्यामुळे दुबार मतदारांबाबत प्रशासनाने गांभीर्याने दखल घेऊन निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार कार्यवाही करावी. जेणे करून दुबार मतदारांबाबत योग्य कार्यवाही व मतदार यादीतील दोष टाळण्यास मदत होईल,

राज्यात मतदार यादीतील घोळ आणि दुबार मतदारांच्या नावांवरून राजकारण चांगलेच तापले आहे. त्यात पिंपरी-चिंचवडमध्येही दुबार मतदारांचा मुद्दा पुढे आला असून भोसरी विधानसभा मतदारसंघात महायुतीतील राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाने १२ हजार दुबार नावे निदर्शनास आणून दिले आहेत. आगामी निवडणूक पारदर्शक वातावरणात पार पाडण्यासाठी मतदार यादीतील त्रुटी दूर करणे आवश्यक आहे. त्रुटी दूर न झाल्यास एकाच प्रभागात वेगवेगळ्या मतदार केंद्रावर दुबार व तिबार मतदान होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे दुबार मतदारांबाबत प्रशासनाने गांभीर्याने दखल घेऊन निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार कार्यवाही करावी. जेणे करून दुबार मतदारांबाबत योग्य कार्यवाही व मतदार यादीतील दोष टाळण्यास मदत होई, असे गव्हाणे यांनी तक्रार अर्जात नमूद केले आहे.





### कारवाईची मागणी

» माजी शहराध्यक्ष अजित गव्हाणे यांनी दुबार मतदारांची यादी महापालिकेच्या निवडणूक विभागाकडे सादर केली आहे. आगामी निवडणूक पारदर्शक वातावरणात पार पाडण्यासाठी मतदार यादीतील त्रुटी दूर करणे आवश्यक आहे. त्रुटी दूर न झाल्यास एकाच प्रभागात वेगवेगळ्या मतदार केंद्रावर दुबार व तिबार मतदान होण्याची शक्यता आहे. त्यामुळे दुबार मतदारांबाबत प्रशासनाने गांभीर्याने दखल घेऊन निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार कार्यवाही करावी. जेणे करून दुबार मतदारांबाबत योग्य कार्यवाही व मतदार यादीतील दोष टाळण्यास मदत होईल, असे त्यांनी तक्रारीत म्हटले आहे.

**“ ही केवळ प्राथमिक आकडेवारी असून प्रत्यक्ष छाननीनंतर फक्त भोसरी मतदारसंघाचा हा आकडा लाखभरांपर्यंत जाऊ शकतो. शहरात नोकरी-व्यवसायासाठी स्थलांतरित झालेले नागरिक इतर जिल्ह्यांत वास्तव्यास असूनही त्यांची नावे शहराच्या मतदार यादीत कायम आहेत. तसेच काही नावे मुद्दामून पुन्हा-पुन्हा टाकल्याचे दिसते. यामुळे मतदारसंख्येत कृत्रिम वाढ होते. राज्यभरातच मोठ्या प्रमाणावर दुबार नोंदी झालेल्या आहेत.**

**- अजित गव्हाणे, माजी शहराध्यक्ष, राष्ट्रवादी कॉंग्रेस**

# आंतरराष्ट्रीय सायकल स्पर्धेसाठी पिंपरीतील रस्त्यांचे डांबरीकरण

## ‘पुणे ग्रँड चॅलेंज टूर’ ही आंतरराष्ट्रीय सायकल स्पर्धा पिंपरी-चिंचवड आणि पुणे शहरात जानेवारी महिन्यात होत आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

‘पुणे ग्रँड चॅलेंज टूर’ ही आंतरराष्ट्रीय सायकल स्पर्धा पिंपरी-चिंचवड आणि पुणे शहरात जानेवारी महिन्यात होत आहे. ही स्पर्धा पिंपरी-चिंचवड शहरातील ५२ किलोमीटर अंतराच्या रस्त्यावरून जाणार आहे. त्यासाठी या रस्त्यांचे डांबरीकरण करून ते चकाचक करण्यात येणार आहेत. त्याचप्रमाणे दुभाजक आणि चौक सुशोभित करण्यात येत आहेत.

सायकलिंग फेडरेशन ऑफ इंडिया, आशियाई सायकलिंग महासंघ, आंतरराष्ट्रीय सायकलिंग महासंघ आणि पुणे जिल्हा प्रशासन यांच्या संयुक्त विद्यमाने ‘पुणे ग्रँड चॅलेंज टूर’ ही आंतरराष्ट्रीय स्पर्धा पुणे, पिंपरी-चिंचवड शहरात प्रथमच होत आहे. स्पर्धा चार टप्प्यात ४३७ किलोमीटर अंतरावर होणार आहे. त्यातील पहिल्या आणि चौथ्या टप्प्यातील स्पर्धा पिंपरी-चिंचवड शहरातील ५२ किलोमीटर अंतराच्या रस्त्यावर होणार आहे. स्पर्धा होणाऱ्या मार्गावरील रस्त्यांची दुरुस्ती आणि सुशोभिकरणाचे काम महापालिकेने हाती घेतले आहे. त्यानुसार महापालिकेच्या शहरी दळणवळण, स्थापत्य विभागाकडून आवश्यक ती कामे करण्यास सुरुवात केली आहे. त्यासाठी महापालिकेने सल्लागार संस्थेची निवड केली आहे.

महापालिका शहरातील स्पर्धा मार्गावरील रस्ते दुरुस्त करून डांबरीकरण करणार आहे. मार्गावरील गतिरोधक काढण्यात येणार आहेत. लेन मार्किंग करून अर्बन स्ट्रीट डिझाइननुसार काम केले जाणार आहे. रस्त्यावरील दुभाजक, विद्युत प्रकाश खांब, बीआरटीचे सुरक्षा कठडे, पुलाची रंगरंगोटी केली जाणार आहे. रस्ते व चौकांमध्ये सुशोभिकरण करण्यात येणार आहे. रोषणाईसाठी विद्युत कामे केली जाणार आहेत. रस्त्याच्या कडेचे गटार तसेच रेलिंगची दुरुस्ती करण्यात येणार आहे.

‘पुणे ग्रँड चॅलेंज टूर’ ही सायकल स्पर्धा शहरात जानेवारी महिन्यात होत आहे. मार्गावरील रस्त्याचे डांबरीकरण, रस्ते आणि चौक सुशोभित करण्यात येत आहेत. रस्त्यावरील उंचवटे व गतिरोधक काढून टाकण्यात येणार आहेत. प्रकाश दिव्यांचे काम, कठडे, दुभाजक यांची आकर्षक पद्धतीने रंगरंगोटी केली जाणार आहे. आवश्यक ठिकाणी ‘लॅण्डस्केपिंग’ केले जाणार असल्याचे शहरी दळणवळण विभागाचे सह शहर अभियंता बापूसाहेब गायकवाड यांनी सांगितले..



### असा आहे शहरातील मार्ग

» औंध येथील राजीव गांधी पूल ते किवळे रस्ता, निगडी येथील भक्ती-शक्ती शिल्प चौक, एमआयडीसी, सेंट मदर टेरेसा उड्डाणपूल ते काळेवाडी फाटा या मार्गावरून स्पर्धा जाणार आहे. विनोदे वस्ती चौक ते भूमकर चौक, आकुर्डीतील डॉ. डी. वाय. पाटील महाविद्यालय, स्पाईन रस्ता, भक्ती-शक्ती चौक ते गोडाऊन चौक अशी शहरातील ५२ किलोमीटर अंतराच्या रस्त्यांवर ही स्पर्धा होणार आहे.

# निवडणुकीच्या तोंडावर थकबाकीदारांना अभयदान!

## महापालिका निवडणुकांच्या तोंडावर प्रशासनाकडून मिळकतकर थकबाकी वसुलीसाठी अभय योजना राबविण्यात येणार आहे

**पुणे | प्रतिनिधी**

महापालिकेचे उत्पन्न घटल्याचे सांगत ऐन महापालिका निवडणुकांच्या तोंडावर प्रशासनाकडून मिळकतकर थकबाकी वसुलीसाठी अभय योजना राबविण्यात येणार आहे, त्यासाठीचा प्रस्ताव तयार करण्यात आला असून तो महापालिका आयुक्तांच्या मान्यतेसाठी ठेवण्यात आला आहे. विशेष म्हणजे, निवडणुकीचा मुहूर्त साधत यावेळी या योजनेत व्यावसायिक मिळकतींनाही दंडात सवलत दिली जाणार आहे. त्यामुळे वर्षानुवर्षे मिळकत कर थकविणाऱ्यांना सवलत देऊन प्रामाणिकपणे वेळेत कर भरणाऱ्या नागरिकांवर महापालिकेकडून अन्याय होत असल्याची चर्चा आहे.

महापालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर सर्वच राजकीय पक्षांच्या पदाधिकाऱ्यांनी अभय योजना राबविण्याची मागणी केली होती. त्यासाठी शासनास पत्र देण्यात आले होते. त्यानुसार, महापालिकेने आपला अभिप्राय शासनाला कळविला होता. आता, या योजनेचा प्रस्ताव तयार होऊन आयुक्तांच्या मान्यतेसाठी ठेवण्यात आला आहे.दरम्यान, महापालिकेच्या मिळकतकराची थकबाकी तब्बल १३ हजार कोटी रुपयांवर गेली आहे.

सुमारे साडेपाच लाख मिळकतधारकांची ही थकबाकी असून, मुळ करावर दरवर्षी २४ टक्के व्याज आकारले जात असल्याने हा आकडा वाढत आहे. दरवर्षी थकबाकी वाढत चालल्याने ही बाब लक्षात घेऊन २०२०-२१ आणि २०२१-२२ मध्ये तत्कालीन स्थायी समितीने अभय योजना राबविली होती. या दोन्ही वेळच्या योजनेतून महापालिकेला सुमारे ६३० कोटी रुपये उत्पन्न मिळाले होते, तर सुमारे २७५ कोटी रुपयांचे व्याज माफ करण्यात आले होते. जवळपास २ लाख १० हजार मिळकतधारकांनी या योजनेचा लाभ घेतला होता.

मात्र, करोना संकटाच्या काळात ही योजना राबविण्यात आली होती. त्यानंतरच्या तीन वर्षांत अभय योजनेचा लाभ घेतलेले सुमारे २४ हजार मिळकतधारक पुन्हा थकबाकीदार झाले असून त्यांनी सुमारे २२१ कोटी रुपयांचा कर थकविला आहे. त्यामुळे या योजनेत पुन्हा सवलत दिल्यास प्रामाणिक करदात्यांवर अन्याय होणार असल्याची चर्चा सुरू आहे. महापालिकेकडून २०२०-२१ आणि २०२१-२२ मध्ये राबविण्यात आलेल्या अभय योजनेत केवळ निवासी मिळकतींच्या दंडावर सवलत देण्यात आली होती. मात्र, यावेळी निवासी मिळकतींसोबतच व्यावसायिक मिळकतींनाही सवलत देण्याचा निर्णय घेण्यात आल्याची माहिती प्रशासकीय सूत्रांकडून मिळाली.



### पुन्हा सवलत दिल्यास प्रामाणिक करदात्यांवर अन्याय

» मात्र, करोना संकटाच्या काळात ही योजना राबविण्यात आली होती. त्यानंतरच्या तीन वर्षांत अभय योजनेचा लाभ घेतलेले सुमारे २४ हजार मिळकतधारक पुन्हा थकबाकीदार झाले असून त्यांनी सुमारे २२१ कोटी रुपयांचा कर थकविला आहे. त्यामुळे या योजनेत पुन्हा सवलत दिल्यास प्रामाणिक करदात्यांवर अन्याय होणार असल्याची चर्चा सुरू आहे.

### व्यावसायिक मिळकतींनाही लाभ?

» महापालिकेकडून २०२०-२१ आणि २०२१-२२ मध्ये राबविण्यात आलेल्या अभय योजनेत केवळ निवासी मिळकतींच्या दंडावर सवलत देण्यात आली होती. मात्र, यावेळी निवासी मिळकतींसोबतच व्यावसायिक मिळकतींनाही सवलत देण्याचा निर्णय घेण्यात आल्याची माहिती प्रशासकीय सूत्रांकडून मिळाली. करोनानंतर अनेकांनी कर भरणे बंद केले असून त्यामुळे थकबाकी आणि दंड दोन्ही वाढले आहेत. त्यांच्याकडूनही अभय योजनेची मागणी केली जात असल्याचे सांगण्यात येत आहे.

### अभय योजना

» सुमारे साडेपाच लाख मिळकतधारकांची ही थकबाकी असून, मुळ करावर दरवर्षी २४ टक्के व्याज आकारले जात असल्याने हा आकडा वाढत आहे. दरवर्षी थकबाकी वाढत चालल्याने ही बाब लक्षात घेऊन २०२०-२१ आणि २०२१-२२ मध्ये तत्कालीन स्थायी समितीने अभय योजना राबविली होती.

# महापालिकेकडून खड्डेमुक्तीचाही इव्हेंट, शहरात खड्डेमुक्त अभियानाची सुरुवात

## मागील पाच महिन्यांपासून खड्ड्यांमुळे त्रस्त असलेल्या पुणेकरांना चांगले रस्ते देण्यासाठी महापालिका प्रशासनाला ऐन निवडणुकांच्या तोंडावर जाग

**पुणे | प्रतिनिधी**

मागील पाच महिन्यांपासून खड्ड्यांमुळे त्रस्त असलेल्या पुणेकरांना चांगले रस्ते देण्यासाठी महापालिका प्रशासनाला ऐन निवडणुकांच्या तोंडावर जाग आली आहे. शहरातील रस्ते नोव्हेंबर अखेरपर्यंत खड्डेमुक्त करण्यासाठी महापालिकेकडून विशेष अभियान सुरु करण्यात आले असून या अभियानाचा उद्घाटन सोहळा घेऊन कामाला सुरुवात करण्यात आली.

धक्कादायक बाब म्हणजे, खड्डे दुरुस्त करणे हे प्रशासनाचे नियमित काम असताना त्याकडे दुर्लक्ष झाल्याने शहराची दयनीय अवस्था झाली आहे. या पार्श्वभूमीवर नागरिकांमधील असंतोष शमवण्यासाठी हे अभियान राबविण्यात येत असल्याचे महापालिकेने जाहीर केले आहे. खड्डेमुक्त रस्ता अभियानची सुरुवात आज सारसबाग येथील सणस ग्राउंडसमोरील छत्रपती शिवाजी महाराज उद्यानाच्या गेटजवळ करण्यात आली.

या ठिकाणच्या अत्यंत खराब झालेल्या, खड्डेयुक्त रस्त्याचे रितसर मिलिंग करून अभियानाचा शुभारंभ करण्यात आला.महापालिकेमार्फत जारी करण्यात आलेल्या एसओपनुसार सदर भागाचे डांबरी पॅचवर्क करून हे उद्घाटन महापालिका आयुक्त नवल किशोर राम आणि अतिरिक्त महापालिका आयुक्त (वि.) ओमप्रकाश दिवटे यांच्या हस्ते, पथ विभागाच्या उपस्थितीत करण्यात आले. आयुक्त राम यांनीही या कामाची पाहणी केली.

या रस्त्यांवरही खड्डे पडले आहेत, अशी कामे करणाऱ्या ठेकेदारांवर कारवाई करण्याऐवजी त्यांच्या चुका महापालिकाच दुरुस्त करीत असल्याचा आरोप नागरिकांकडून होत आहे. शहरातील सर्व भागांतील रस्त्यांवरील खड्डे बुजवण्याचे काम या महिन्याअखेरपर्यंत सुरू राहणार आहे. या कामासाठी ना नफा, ना तोटा या तत्त्वावर काही ठेकेदारांनी महापालिकेला सहाय्य करण्याची तयारी दर्शवली असून त्यांच्या सहकार्याने हे काम सुरू करण्यात आल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात येत आहे.



### खड्ड्यांचे खापर पोलिसांवर...

» महापालिकेने पोलिसांसाठी राबविण्यात येणाऱ्या सीसीटीव्ही प्रकल्पाच्या अंतर्गत शहरातील विशेषतः मध्यवर्ती पेठ भागात मोठ्या प्रमाणावर रस्ते आणि पदपथांमध्ये खोदाई करण्यात आल्याचे सांगितले आहे. या पार्श्वभूमीवर शहरातील रस्ते खड्डेमुक्त करण्याचा संकल्प महापालिकेने केल्याचे पथ विभागाकडून सांगण्यात येत आहे. मात्र, प्रत्यक्षात २०२२-२३ आणि २०२३-२४ या कालावधीत महापालिकेने पाच पॅकेज अंतर्गत तब्बल ३५० कोटी रुपये खर्चून सुमारे १०० किलोमीटरहून अधिक रस्त्यांची कामे केली होती.

# पिंपरखेड कडकडीत बंद; बिबट हल्ल्यांच्या निषेधार्थ नागरिकांचा संताप

## राज्य मार्गावर रास्ता रोको आंदोलन; तणावग्रस्त परिसरात पोलिसांचा फौजफाटा तैनात

**पुणे | प्रतिनिधी**

शिरूर तालुक्यातील पिंपरखेड येथे रविवारी (दि. 2) दुपारी झालेल्या बिबट्याच्या हल्ल्यात रोहन विलास बोंबे या मुलाचा मृत्यू झाल्याने संपूर्ण परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. या घटनेच्या निषेधार्थ जांबुत आणि पिंपरखेड गावांमध्ये सोमवारी (दि. 3) कडकडीत बंद पाळण्यात आला. घटनेनंतर संतप्त ग्रामस्थांनी मुलाच्या मृतदेहाचे शवविच्छेदन करण्यास नकार दिला होता. मात्र, रात्री 11 वाजण्याच्या सुमारास तहसीलदार बाळासाहेब म्हस्के आणि पोलिस उपविभागीय अधिकारी प्रशांत ढोले यांनी घटनास्थळी भेट देऊन ग्रामस्थांशी चर्चा केली. त्यानंतर मृतदेह मंचर येथील ग्रामीण रुग्णालयात शवविच्छेदनासाठी रवाना करण्यात आला. रविवारी दुपारी पावणेचार वाजण्याच्या सुमारास घडलेल्या या घटनेनंतर परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले



### नांदूर परिसरात बिबट्यांचा वावर

» नांदूर (ता. दौंड) येथे गेल्या दोन दिवसांपासून बिबट्यांचा वावर सुरू असल्याने परिसरात भीतीचे सावट पसरले आहे. गावाजवळील शेतात बिबट्याचे प्रत्यक्ष दर्शन झाल्याची माहिती नीलेश थोरात यांनी दिली. राहू येथील सोनवणे मळा परिसरातही बिबट्याने धुमाकूळ घातला असून येथील एका शेतकऱ्याचा, दोन बकऱ्यांचा बिबट्याने फडशा पाडला असल्याचे शेतकरी सचिन नवले यांनी सांगितले. या घटनेनंतर वन विभागाचे अधिकारी व पथक तत्काळ घटनास्थळी दाखल झाले असून, परिसरात शोधमोहीम सुरू आहे. अनेक शेतकऱ्यांच्या जनावरांवर बिबट्याने हल्ले केल्याची माहितीही समोर आली आहे. गावक-यांना सतत सतर्क राहून आपल्या घराबाहेर रात्री न जाण्याचे आवाहन करण्यात आले आहे. वन विभागाने पिंजरा लावण्याची मागणी विशाल थोरात, पोपटराव बोराटे, अतुल बोराटे, नामदेव बोराटे, हेमंत घुले यांनी केली आहे. ग्रामस्थांनी प्रशासनाकडे तत्काळ सुरक्षेची मागणी केली असून, परिसरात अद्यापही दहशतीचे वातावरण कायम आहे.

संतप्त नागरिकांनी वन विभागाचे वाहन व बेस कॅम्प पेटवून दिले, तसेच पंचतळे व रोडेवाडी फाटा येथे बेल्हे-जेजुरी राज्य मार्गावर रास्ता रोको आंदोलन केले. या दरम्यान नागरिकांनी मोठ्या संख्येने घटनास्थळी गर्दी केली होती. गेल्या दोन आठवड्यांतील हा बिबट्याच्या हल्ल्यातील तिसरा बळी ठरला आहे. तरीही वन विभाग व प्रशासनाकडून ठोस उपाययोजना न केल्याने नागरिकांमध्ये तीव संतापाची लाट उसळली आहे. या घटनेच्या निषेधार्थ जांबुत, पिंपरखेड, पंचतळे परिसरात सर्वच व्यवहार बंद ठेवण्यात आले, फक्त अत्यावश्यक सेवा सुरू होत्या. नागरिकांचा उद्रेक लक्षात घेऊन पंचतळे फाटा परिसरात पोलिसांचा मोठा फौजफाटा तैनात करण्यात आला असून, परिस्थिती नियंत्रणात असल्याचे प्रशासनाने सांगितले.

गेल्या दोन दिवसांपासून बिबट्यांचा वावर सुरू असल्याने परिसरात भीतीचे सावट पसरले आहे. गावाजवळील शेतात बिबट्याचे प्रत्यक्ष दर्शन झाल्याची माहिती नीलेश थोरात यांनी दिली. राहू येथील सोनवणे मळा परिसरातही बिबट्याने धुमाकूळ घातला असून येथील एका शेतकऱ्याचा, दोन बकऱ्यांचा बिबट्याने फडशा पाडला असल्याचे शेतकरी सचिन नवले यांनी सांगितले. या घटनेनंतर वन विभागाचे अधिकारी व पथक तत्काळ घटनास्थळी दाखल झाले असून, परिसरात शोधमोहीम सुरू आहे. अनेक शेतकऱ्यांच्या जनावरांवर बिबट्याने हल्ले केल्याची माहितीही समोर आली आहे

### शाळा ओस पडल्या

» रोहन बोंबेच्या मृत्यूनंतर विद्यार्थी आणि पालकांमध्ये प्रचंड भय पसरले असून, सोमवारी (दि. 3) जिल्हा परिषद प्राथमिक शाळा व माध्यमिक विद्यालये पूर्णपणे बंद राहिली. वाड्या-वस्त्यांवर राहणारी मुले चार-पाच किलोमीटर अंतरावरून शाळेत येतात; मात्र आता पालकांशिवाय घरा बाहेर पडायलाही ती घाबरत आहेत. भीतीच्या छायेत शिक्षण ठप्प झाले असून ग्रामस्थांनी तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली आहे.

# शेतकऱ्यांसाठी खुशखबर! 'कर्मयोगी' कारखाना देणार जिल्ह्यातील सर्वाधिक ऊसदर?

## कर्मयोगी व ओंकार शुगरचा देशातील पहिला सहयोगी प्रयोग, सहकार टिकवण्याचा आदर्श उपक्रम - हर्षवर्धन पाटील

**पुणे | प्रतिनिधी**

कर्मयोगी शंकररावजी पाटील सहकारी साखर कारखाना लि. आणि ओंकार शुगर अँड डिस्टिलरी पॉवर प्रा. लि. यांच्या सहयोगातून गळीत हंगाम 2025-26 चा शुभारंभ सोमवारी (दि. 3) माजी मंत्री आणि कारखान्याचे अध्यक्ष हर्षवर्धन पाटील यांच्या हस्ते करण्यात आला. या प्रसंगी पाटील म्हणाले, सहकार टिकवण्याचा हा देशातील पहिलाच प्रयोग असून, यामुळे सहकाराची गती आणि शेतकऱ्यांचा विश्वास दोन्ही दृढ होणार आहेत.

हर्षवर्धन पाटील पुढे म्हणाले, कर्मयोगी साखर कारखाना ही तालुक्याच्या प्रगतीची मातृसंस्था आहे. ओंकार शुगरच्या सहयोगातून शेतकरी आणि कामगारांचे हित सुरक्षित राहील. सर्व ऊस वेळेवर गाळप करून शेतकऱ्यांना योग्य दर देण्याचा प्रयत्न केला जाईल. ते म्हणाले, केंद्र सरकारने 1050 कोटी लिटर इथेनॉल निर्मितीचा टेंडर काढला असून, त्यातील 650 कोटी लिटर साखर उद्योगासाठी राखीव ठेवण्यात आला आहे.

हा निर्णय उद्योग क्षेत्रासाठी दिलासादायक आहे. शेतकऱ्यांनी एआय तंत्रज्ञानाचा वापर करून अधिक उत्पादन घेण्यावर भर द्यावा. ओंकार शुगर ग्रुपचे चेअरमन बाबुराव बोत्रे पाटील म्हणाले, कर्मयोगी साखर कारखान्याशी सहयोगी तत्वावरचा हा उपक्रम महाराष्ट्रातीलच नव्हे, तर देशातील पहिलाच यशस्वी प्रयोग आहे. हा मॉडेल सहकार क्षेत्रासाठी आदर्श ठरेल. शेतकऱ्यांच्या ऊसाचे 15 दिवसांत पेमेंट व कर्मचाऱ्यांना वेळेवर वेतन देणे हे आमचे ब्रीद आहे.

ते पुढे म्हणाले, या हंगामात गाळप उद्दिष्ट पूर्ण झाल्यास पुणे जिल्ह्यातील सर्वाधिक ऊसदर देण्याचा प्रयत्न करण्यात येईल.या वेळी कारखान्याचे संचालक, अधिकारी, ऊस तोडणी वाहतूकदार आणि सभासद शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रास्ताविक जितेंद्र माने, सूत्रसंचालन नितीन भोसले, तर आभार भूषण काळे यांनी मानले.



### सर्वाधिक ऊसदर देऊ – बोत्रे पाटील

» या हंगामात 14 लाख टन ऊस गाळपाचे उद्दिष्ट पूर्ण झाल्यास शेतकऱ्यांना जिल्ह्यातील सर्वाधिक ऊसदर दिला जाईल, असे ओंकार शुगर ग्रुपचे चेअरमन बाबुराव बोत्रे पाटील यांनी सांगितले. त्यांच्या वक्तव्याला उपस्थित शेतकऱ्यांनी टाळ्यांचा गजर करून उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.